स्थायी समितीच्या **शनिवार** दिनांक **03–09–2011** रोजी **दुपारी 03–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 8. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 9. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 10. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 11. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 12. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 13. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 14. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 15. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 16. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड सिद्दीकी, उपनिगम आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 66</u> :– मे. कार्टेल आऊटडोअर ॲडर्व्हटाईजींग प्रा.लि., नागपूर यांना नागपूर महानगरपालिकेच्या पथदिव्यांच्या खांबांवर जाहिरातीचे अधिकार देण्याबाबत तत्कालीन स्थायी समिती ने ठराव क्रमांक 643 दि. 17.02.2009 अन्वये मे. कार्टेल आऊटडोअर ॲडर्व्हटाईजींग प्रा.लि., यांनी तत्कालीन मा. अध्यक्ष स्थायी समिती यांना निविदेतील काही अटी शिथील (उदा. निविदेपोटी दयावयाची वार्षीक रक्कम 12 इ.एम.आय. स्वरुपात व्याजाची आकारणी न करता देणे, जेस्टेशन पिरीयड वाढवून देणे इत्यादी) करुन निविदा मंजूर करावी अश्या आशयाच्या दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने विभागाने चर्चा करुन मा. आयुक्त यांनी योग्य निर्णय घ्यावा असा 'निर्णय' घेतला त्या अनुषंगाने विभागाने दिलेल्या प्रस्तावावर मा. आयुक्त यांनी मुख्यत्वे जेस्टेशन पिरीयड (कंत्राटदारास प्रिमीयम लायसन्स फि भरण्यापासून सूट मिळण्याचा म्हणजेच कीऑस्कस् लावण्याचा कालावधी) जो एक महिन्याचा होता तो चार महिन्यांच्या कालावधी करीता वाढवून देऊन तसेच एकमुश्त रक्कम भरण्याची अट द.सा.द.शे. 12% व्याजाच्या आकारणीसह शिथील करुन निविदेस मंजूरी दिली., त्यानुसार निविदाकारासोबत करारनामा करुन निविदाकारास कार्यादेश देण्यात आला मात्र निविदाकाराने दि. 02.02.2010 ला तसेच दि. 12.04.2010 ला दिलेल्या पत्रामध्ये जेस्टेशन पिरीयड चार महिन्यांनी वाढवून दयावा, 12% द.सा.द.शे. दराने व्याज आकारण्याची अट रद्द करावी काही नविन साईटस्वर जाहीरातीचे हक्क मिळावे तसेच काही साईटस्वर पथदिव्यांचे खांब मध्यभागी लावून (व हे खांब पथदिवे इत्यादी लावण्याचा खर्च त्यांना नामपास देय असलेल्या रकमेतून वळता करण्यास किंवा यापोटी अधिकच्या कालवधीकरीता जाहिरात करण्याचे हक्क देण्याच्या अटीसह) त्यावर जाहीरातीचे हक्क देण्यास तसेच दि. 11.05.2010 च्या पत्रान्वये निविदेतील अट क्र. 29 (व विशेषतः 29.10) अन्वये निविदेतील काही साईट्स वर त्यांचे किऑस्कस्मधील साहित्याची चोरी होणे, किऑस्कची अनैतीक तत्वांकडून मोडतोड होणे व यादृष्टीने साईट्स अव्यवहार्य (फिजीबल नाहीत) असणे या कारणांमूळे अश्या साईट्स ऐवजी नविन साईटस्ची मागणी केली आहे व साईट्स उपलब्ध नसल्यास निविदेतील साईट्स गाळण्यास (Delate) विनंती केली आहे. (ज्यामुळे त्यांना प्रिमीयम–लायसन्स फी भरण्यापासून सूट मिळेल) त्याअनुषंगाने मे. कार्टेल आऊटडोअर ॲडर्व्हटायईजींग प्रा. लि. यांचा –

1. जेस्टेशन पिरीयड (कंत्राटदारास वार्षीक प्रिमीयम व लायसन्स् फि चा भरणा करण्यापासून सूट देण्याचा कालावधी ज्यामध्ये कंत्राटदारास किऑस्कस् उभारण्याचा कालावधी समाविष्ट आहे.) 1 फेब्रुवारी 2010 पर्यंत वाढवून देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच
2. कंत्राटदारास वार्षीक एकमुश्त दयावयाची रक्कम 12 ई.एम.आय. नुसार देण्यास 12% द.सा.द.शे. व्याजाच्या आकारणीसह व पोस्ट डेटेड चेक्स् देण्याच्या अटीसह मंजूरी देण्याचा प्रश्न तसेच
3. कंत्राटदाराने निविदेत नमुद साईट्स अव्यवहार्य असण्यासंबंधी केलेले प्रतिपादन उदा. अनैतीक तत्वांद्वारे किऑस्कस्चे साहित्याची चोरी होणे – किऑस्कची मोडतोड होणे इत्यादी बाबत पोलीस कंम्प्लेंटस् व इतर सबळ पुरावे सादर करण्याच्या अधिन राहून अश्या साईट्सऐवजी दुसऱ्या साईटस् देणे किंवा गाळणे यास कंत्राटदाराकडून नामपास 3595 पथदिव्यांच्या खांबावर जाहिरातीचे हक्कापोटी मिळावयाच्या एकूण रकमेत 10% पेक्षा जास्त घट होणार नाही याचे अधीन राहून मंजूरी प्रदान करण्याचा व ज्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला बसविलेल्या खांबाऐवजी रस्त्याच्या मध्यभागी पथदिव्यांचे खांब बसवावयाचा प्रस्ताव कंत्राटदाराने दिलेला आहे अश्या ठिकाणी असे खांब विभागाने दिलेल्या स्पेसिफिकेशन्स्नुसार नामपाच्या रजीस्टर्ड कंत्राटदाराकडून मे. कार्टेल आऊटडोअर

ॲडर्व्हटाईजींग प्रा.लि., यांना बसविण्याची परवानगी देण्याचा व बसवून त्यावरील खर्च कंत्राटदारातर्फे प्राप्त 12 ई.एम.आय. मधून एक वर्षाच्या कालावधीत समप्रमाणात (ई.एम.आय.) वळता करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कायद्याच्या सल्लागाराचे अभिमत घेऊन, परत स्थायी समितीकडे विषय ठेवण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 67</u> :– गोरेवाडा पाणीपूरवठा केंद्र पेंच टप्पा – 2 च्या चालू कंत्राटाची मुदत दि. 06.05.2011 ला संपल्यामुळे तसेच नविन निविदा मंजूरी प्रक्रियेत असल्यामुळे चालू कंत्राटास दि. 06.09.2011 पर्यत म्हणजेच 04 महिन्याचे कालावधीकरीता मुदतवाढ देण्याचा व त्यापोटी येणाऱ्या रु. 9,77,268/– चे खर्चासह या कामावर होणाऱ्या एकुण रु. 97,72,691/– चे खर्चास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 68</u> :– राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र मुंबई यांचे दि. 8 ऑगस्ट 2011 चे पत्रान्वये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या अद्यावतीकरणाकरीता तसेच निवडणूक प्रक्रिया पारदर्शक करुन मतदारांना सुविधा उपलब्ध करुन देणे, मतदार यांदी तयार करणे, मतदार व्हा, या प्रकल्पावर होणारा खर्च भागविणे, या कामाकरिता रु. 4/– प्रति मतदार याप्रमाणे नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील सरासरी मतदार संख्या 20 लक्ष विचारात घेवून एकूण रु. 80,00,000/– (ऐशी लक्ष रुपये) राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र मुंबई यांचे खात्यामध्ये अग्रिम काढून जमा करण्याकरिता मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. व या खर्चाचे समायोजन पद क्र. 16 निवडणूक खर्च या पदाअंतर्गत करण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 69</u> :– शहरातील पाण्याच्या टाक्या (जलकुंभ) स्वच्छ करण्याच्या कामाच्या रु. 78,17,559/– च्या अपेक्षित वार्षीक खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, तसेच या कामाचा दरकरार करण्याकरिता निविदा बोलविण्यास अनुमती प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 70</u> :– वर्धा रोड ते जयताळा पर्यंत डिफेंन्स रेल्वे लाईनच्या जागेवर वाणिज्यीक व मिश्र वापराचा विकास करण्यास्तव श्री. हफीज कॉन्ट्रक्टर, वास्तुशिल्पकार यांची प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार (PMC) करिता नियुक्ती पुढील अटींवर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

- श्री. हफीज कॉन्ट्रक्टर, वास्तुशिल्पकार यांना प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार च्या कामाकरीता Estimated cost किंवा Tender Cost (जे कमी असेल) वर 3 टक्के शुल्क देणे.
- प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार यांना BOT Operator द्वारे शुल्क देणे.

- प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार यांना मनपा तर्फे रु. 25.00 लक्ष काम सुरु करण्याकरीता देणे व ती रक्कम BOT Operator कडुन कंत्राट निश्चित झाल्यावर लगेच घेणे व तशी अट निविदा प्रपत्रात समाविष्ट करणे.

<u>ठराव क्रमांक 71</u> :– आर्थीक वर्ष सन 2009–2010 चे सुधारीत व सन 2010–2011 चे प्रस्तावित अंदाजपत्रकात जकात दर अनुसचीतील पद क्र. 16 (अ) अंतर्गत सर्व प्रकारच्या मिठाई, सेव व चिवडा हया मालाच्या वर्णनात सर्व प्रकारच्या मिठाई, सेव, चिवडा (फरसाण) असा बदल करुन प्रचलित दर 5% वरुन 2% करुन सदर्हु माल नवीन पद क्र. 16 (ड) मध्ये समाविष्ठ करणेबाबतचा निर्णय म.न.पा. ठराव क्र.100 दि. 30.05.2010 अन्वये मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना प्रदान केलेला अधिकारांतर्गत घेण्यात आलेला होता. सदर्हु निर्णयास महाराष्ट्र शासन निर्णय क्र. नामपा 2011/प्र.क्र.25 नवि–26, नगर विकास विभाग, दिनांक 8 जुन 2011 अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर्हु निर्णय दिनांक 14 जुन 2011 च्या शासन राजपत्रात प्रसिध्द देवून लागू करण्यात आलेला आहे. व निर्णयानुसार सर्व प्रकारच्या मिठाई, सेव, चिवडा (फरसाण) इ. मालाकरीता 2% दराने जकात कर वसुलण्यात येत आहे व हया व्यतिरीक इतर खादय पदार्थावर 5% दराने जकात कर वसुल करण्यात येत आहे. परंतु आयातकर्ते मे. हल्दीराम फुड्स इन्टरनॅशनल लिमी. 880, हल्दीराम हाऊस, स्मॉल फॅक्टरी एरीया, नागपूर यांनी दि. 15.07.2011 चे पत्राद्वारे विनंती केले की संबंधीताद्वारा आयात होणारे सर्व प्रकारच्या मिठाई, सेव, चिवडा (फरसाण) व्यतिरीक्त महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे Notification No. VAT 1505/CR-165/Taxation -1 dated 1st June 2005 च्या अधिसुचनेनुसार फरसाण हया वर्गवारीत मोडणाऱ्या सर्व खाद्यपदार्थावर 2% दराने जकातकर घेण्यात यावा.

जकात विभागाद्वारे वसुलण्यात येत असलेला जकातकर हा तत्कालीन स्थायी समिती द्वारा घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे असून संबंधीतांनी केलेली लेखी विनंती ही म.न.पा.च्या आर्थीक बाबीशी संबंधीत असल्याने व तत्कालीन स्थायी समिती द्वारा जकात दर अनुसूचीतील पद क्र. 16(अ) मध्ये समाविष्ठ सर्व प्रकारच्या मिठाई, सेव, चिवडा हया मालाच्या मुळ वर्णनात सर्व प्रकारच्या मिठाई, सेव, चिवडा (फरसाण) असा बदल करुन प्रचलित दर 5% ऐवजी 2% दराने घेण्याचा व सदर्हु माल नवीन जकात कर पद क्र.16 (ड) मध्ये समाविष्ठ करण्याचा निर्णय हा तत्कालीन स्थायी समितीचा असल्याने संबंधीतांनी सादर केलेल्या विनंतीवर उचित निर्णय होणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन (फरसान) ची व्याख्या शेव व चिवडा यांचे जे जे मिश्रण असेल ते ते फरसान समजण्यात येऊन त्या प्रमाणे निर्णय घेण्यात यावा या सुचनेसह एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 72</u> :– स्थायी समिती ठराव क्र. 784 दि. 08.02.2011 अन्वये विभागाद्वारे रोड स्वीपींग मशीन खरेदी करुन ती पुरवठादारा मार्फत चालविण्याकरीता निविदा बोलविण्या असता अपेक्षे पेक्षा जास्त दर प्राप्त झाल्यामुळे, विभागाद्वारे यंत्र खरेदी न करता कंत्राटदाराने स्वतःच्या यंत्राद्वारे रस्ते सफाई करण्यास्तव प्रति किलोमिटर प्रमाणे दर निश्चित करुन प्रथमता अंदाजे 100 किमी लांबीच्या रस्ते सफाईच्या कामाचे 5 व 7 वर्षाकरिता निविदाद्वारे दर बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 73</u> :— नागपूर महानगरपालिकेच्या सन 2011—2012 च्या अंदाजपत्रकातील व्यय पद क्र. 416 मध्ये उपलब्ध तरतुद रु. 7000/— लक्ष अंतर्गत राखीव तरतुद रु. 600/— लक्ष मागासवर्गीय वस्तीत टॅकर द्वारे पाणीपुरवठा करणे यामधुन रु. 250/— लक्ष दुर्बल घटक अंतर्गत विविध पदात पुर्नविनियोजना द्वारे वळती करण्याचा प्रश्न तसेच

नागपूर महानगरपालिकेच्या सन 2011—2012 च्या अंदाजपत्रकातील व्यय पद क्र. 416— नागपूर इन्व्हॉरमेंट सर्विसेस लि. नागपूर अंतर्गत 7000/— लक्ष ची तरतुद उपलब्ध आहे. त्यापैकी रु. 600/— लक्ष मागासवर्गीय वस्तीत टॅकर द्वारे पाणीपूरवठा करण्याकरीता राखीव आहे. त्यामधून रु. 250/— लक्ष दुर्बल घटक अंतर्गत खालीलप्रमाणे विविध पदामध्ये पुर्नविनियोजना द्वारे वळती करण्याचा प्रश्न,

| पद क्र. | पदाचे नाव | वळती करण्यात येणारी रक्कम (रु. लाखामध्ये) |
|---|---|---|
| 625 | भुमीगत नाली बांधणे | 50 |
| 626 | स्वस्त प्रकाराचे संडास निर्मिती | 25 |
| 670 | गलिच्छ वस्ती सुधारणा अंतर्गत अतिरिक्त सवलती | 25 |
| 350 | खांडकी व सिमेंट पेव्हींग दुरुस्ती | 50 |
| 710 | उद्यान सुधारणा | 25 |
| 685 | रस्त्याचे निर्माण | 75 |
| | एकुण | 250 |

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन खालील प्रमाणे विविध पदामध्ये पुर्नविनियोजनाद्वारे वळती करण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| पद क्र. | पदाचे नांव | प्रस्तावित 2011—12 | घट | वाढ | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| 350 | खांडकी व सिमेंट पेव्हिंग व दुरुस्ती | 75.00 | 0.00 | 40.00 | 115.'00 |
| 405 | मागासवर्गीय वस्तीत इलेक्ट्रिक पोल लावणे | 50.00 | 0.00 | 25.00 | 75.00 |
| 616 | टॅकर द्वारा पाणी पुरवठा करणे | 600.00 | 300.00 | 0.00 | 300.00 |
| 625 | भुमिगत नाली बांधणे | 100.00 | 0.00 | 40.00 | 140.00 |
| 626 | स्वस्तप्रकारचे संडास निर्मिती | 50.00 | 0.00 | 50.00 | 100.00 |
| 670 | गलीच्छ वस्ती सुधारणा अंतर्गत अतिरीक्त सवलती | 205.00 | 0.00 | 25.00 | 230.00 |
| 685 | रस्त्यांचे निर्माण | 900.00 | 0.00 | 100.00 | 1000.00 |
| 710 | उद्यान सुधारणा | 50.00 | 0.00 | 25.00 | 75.00 |
| 761 | प्राथमिक शाळा भवन निर्माण | 35.00 | 5.00 | 0.00 | 30.00 |
| | **एकूण** | 2065.00 | 305.00 | 305.00 | 2065.00 |

तसेच वार्ड क्र. 11 मधील लुंबीनी नगर व नागसेन नगर येथे खांडकी पेव्हींग करण्याकरिता पद क्र. 350 मधून रु. 6,00,000/— प्रावधान ही स्थायी समिती प्रस्तावित कामास व तरतूदीस एकमताने मंजूरी प्रदान करते.

**<u>ठराव क्रमांक 74</u>** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर